UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol II 10th February 2018

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

Scanned by CamScanner

# Current Global Reviewer

**UGC Approved International Research Refereed Multidiciplanary Journal**

**Editor In Chief**
**Mr. Arun B. Godam**

SPECIAL ISSUE Issue I , Vol II , Published on 10th Feb. 2018

**Editorial Office Address :**
Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999
Email- hitechresearch11@gmail.com

Publisher
Shaurya Publication
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

Rs. 400/-

## EXECUTIVE EDITORS

**Dr. Chitta Ranjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous College , Cuttack – (Orissa)

**Prof. Helambe H.B.**
Head, Dept. of Public Administration
R.B. Attal College, Georai
Dist. Beed

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Prof. R.B. Kale**
Head, Dept. of Sociology
R.B. Attal College, Georai,
Dist. - Beed

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr U.V.Panchal**
H.O.D. Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. Hanumant Mane**
R.Guide & Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. Sachin Kadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm. & B.N. Sarda Sci. College, Sangmner, Dist. Ahmadnagar (M.S.)

www.rjournals.co.in



Scanned by CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II, 10th Feb. 2018

# "जागतिकीकरण आणि कुटुंब"

**प्रा. आर.वी. काळे**
*सह.प्रा.- समाजशास्त्र विभाग , र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई जि.बीड*

--------------(26)--------------

**प्रस्तावना**

प्राचीन काळात व्यक्ती प्रथम टोळ्या करून राहायला लागली. त्यातील प्रगत अवस्था म्हणून कुटुंब व्यवस्था अस्तित्वात आली. भारतीय संस्कृतीत नीती - अनीतीच्या कल्पना अगदी मुळापर्यंत रुजल्या आणि विवाहसंबंध तसेच इतर नात्यांना पवित्र आले. या पवित्र नात्यांच्या संकल्पनेतून एक आदर्श अशी कुटुंबव्यवस्था आपल्याकडे रुजली आणि जोमाने वाढली. भारतीय संस्कृतीमध्ये विश्वाला कुटुंबाची उपमा दिलेली आहे. 'विश्वची माझे घर' म्हणजे विश्वालाच एक कुटुंब मानले विश्वाची माझे घर या संकल्पनेनुसार जगातील एकत्रीत कुटुंबावर जेव्हा एखादी नैसर्गिक किंवा मानव निर्मीत आपत्ती कोसळते तेव्हा इतर कुटुंब सदस्यांनी केलेली सहाय्यता किंवा मदत रक्ताच्या नात्यापलिकडेही प्रेम आणि मायेने जोडलेल्या नात्यातील मानवतेच्या कुटुंबाला जिद्दीने आणि ताठ मानेने जगण्यास मदत होते. प्राचीन भारतीय संस्कृती अध्यात्म व त्यागावर आधारीत होती व तिचा उद्देश विश्व कल्याण हा होता. परंतु बदलत्या सामाजिक परिस्थितीत पाश्चात्यांच्या पाठोपाठ भारतीय कुटुंब व्यवस्थेवर त्याचे परिणाम होऊ लागले. भारताने १९९१ मध्ये मुक्त अर्थव्यवस्थेची धोरण स्वीकारले व त्यातून नवसाम्राज्यवाद अस्तित्वात आला. त्यामुळे जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण या संकल्पना अस्तित्वात आल्या. या संकल्पनातून विश्व जवळ येवू लागले, परंतु मानव मानवापासून दूर होत चालला. जागतिकीकरणाच्या संस्कृतीतून अर्थकेंद्रीत उपभोगतावाद वाढला व प्रत्येक गोष्ट आर्थीक फायद्याच्या दृष्टीकोणातून बघण्यास सुरुवात झाली. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेशी आर्थीक घटकाबरोबर, सामाजिक, राजकीय , धार्मीक, संस्कृतीक मानवी वर्तन व सर्व संस्था जोडल्या गेलेल्या आहेत. त्यामुळे जागतिकीकरणाच्या या सर्व घटकावर सकारात्मक व नकारात्मक दिर्घ परिणाम झालेले दिसून येतात.

**उद्देश :-**

१. जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेणे.

२. समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून कुटुंबाची संकल्पना समजून घेणे.

३. जागतिकीकरणाचा भारतीय कुटुंबव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा आढावा घेणे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंधसाठी द्वितिय तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला त्यामध्ये संदर्भ ग्रंथ मासिके इंटरनेट इ.

**जागतिकीकरणाचा अर्थ :-**

जागतिकीकरणाचा अर्थ म्हणजे संपूर्ण जगाची एक मोठ्या बाजारपेठेत रुपांतरीत होण्याची प्रक्रिया होय. वस्तू आणि सेवा तसेच भांडवल आणि श्रम यांच्या व्यापारावरील निर्बंध उठवून जागतिक पातळीवर व्यापार मुक्तपणे घडून येण्याची प्रक्रिया यात सामावलेली आहे. जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंची किंवा पदार्थांची जागतिक स्तरावर स्थानांतराची प्रक्रिया ह्या संज्ञेचा उपयोग बहुदा आर्थीक जागतिकीकरणाच्या संदर्भात केला जातो. त्यात व्यापार विदेशी थेट गुंतवणूक, भांडवल प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी खुले केले होते.

रुसी मोदी यांच्या मते "जागतिकीकरण म्हणजे खुली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढवीणे तसेच संपूर्ण जगाची एक बाजारपेठ निर्माण करणे आणि वस्तू व सेवा यांची विक्री करणे होय."

जगदीश भगवती यांच्या मते, "जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये पुढील प्रक्रियाद्वारे सामाविष्ट करुन घेणे. बहुराष्ट्रीय कंपन्या, व्यापार व महामंडळे यांच्याकडून प्रत्यक्ष गुंतवणूक अल्पकालीन भांडवल प्रवाह कामगार व एकूण मानवाची आंतरराष्ट्रीय गतिमानता आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह."



Scanned by CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol II , 10th Feb. 2018

वरील व्याख्येवरून असे दिसून येते की जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कोणत्याही व्यक्ती स्वतंत्र अथवा विभक्त समूहाचा भाग न राहता संपूर्ण समाजच येथे जागतिक व्यवहाराशी जोडला गेला आहे. जे स्थानिक आहे ते जागतिक आहे आणि जे जागतिक आहे ते स्थानिक आहे.

**भारतीय कुटुंब :-**

कुटुंब हा प्राथमिक गट असून सार्वत्रिकता हे कुटुंब संस्थेचे वैशिष्ट्य आहे. प्रजननाची ओढ, वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा आपुलकी, प्रेम हे कुटुंबास दृढ करणारे घटक आहेत. लैंगिक वासनांची पूर्तता ही सहजप्रवृत्ती आहे. कामवासनेच्या पूर्ततेचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे प्रजोत्पादन, जन्मलेल्या मुलांचे संगोपन, पालनपोषण, सामाजिकरण करण्याचे कामाच्या सामाजिक संबंधांतून होते ती संस्था म्हणजे कुटुंबसंस्था होय. व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास, व्यक्तीच्या समाजबाह्य वर्तनावर नियंत्रण, समाजाची उद्दिष्ट्ये समजावून देणे, शारीरिक मानसिक सक्षमता वर्तनप्रकार, भूमिकांचे शिक्षण-प्रशिक्षण, संकटांचा सामना करण्याची क्षमता विकसित करणे, जबाबदाऱ्या आणि कर्तव्य भावना निर्माण करणे इ. महत्त्वपूर्ण कार्ये कुटुंबसंस्थेमार्फत पार पाडले जातात. पारंपारिक भारतीय कुटुंबव्यवस्थेचे स्वरूप संयुक्त कुटुंब होते इरावती कर्वे यांच्या मते "संयुक्त कुटुंब म्हणजे एकाच घरात राहणाऱ्या एकत्र भोजन करणाऱ्या संपत्तीवर समान अधिकार ठेवणाऱ्या, परस्परांशी रक्ताच्या नात्याने संबंधीत असणाऱ्या स्त्री, पुरुष आणि मुलांचा समूह म्हणजे संयुक्त कुटुंब होय". डॉ.देसाई यांच्या मते "ज्या कुटुंबात एकापेक्षा अधिक पिढ्यांचा समावेश होतो आणि ज्यातील सदस्य उत्पन्न, संपत्ती, अधिकार, आणि कर्तव्ये व बाबतीत परस्परांशी संबंधीत असतात ते संयुक्त कुटुंब होय.

भारतीय संयुक्त कुटुंबव्यवस्था ही वैशिष्ट्ये दर्शवते जसे सामान्य निवासस्थान समान भोजनगृह, सामायिक संपत्ती धार्मिक कार्यात किंवा उत्सवात सर्वांचा सहभाग, मोठा आकार आर्थिक स्वंय आपलेपणाची भावना इ. पारंपारिक समाजात संयुक्त कुटुंबाचे प्रचलन मोठ्या प्रमाणात होते. परंतु आधुनिकीकरणामुळे तसेच जागतिकीकरणामुळे भारतीय कुटुंबव्यवस्थेत प्रभावित झाल्याचे दिसून येते.

समाज हा परिवर्तनशील आहे. कोणताही समाज स्थिर राहू शकत नाही. परिवर्तनाची गती मात्र कमी अधिक स्वरूपात प्रत्येक समाजात भिन्न असू शकते भारतीय समाजातील वेगवेगळ्या घटकांमध्ये झालेल्या कमी-अधिक परिवर्तनाचा प्रभाव लक्षात घेता येतो. जागतिकीकरणामुळे उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या संधी वाढल्या असून विशेषत शहरी भागामध्ये भारतीय कुटुंबावर मोठा प्रभाव पडलेला आहे विकसीत राष्ट्रामध्ये उच्च शिक्षणासाठी किंवा रोजगारासाठी भारतातील बहुतेक विवाहित पुरुष व स्त्रीया आपल्या पती, पत्नी आई-वडील आणि मुले सोडून जात आहेत ह्यामुळे भारतीय भारतीय आदर्श पारंपारिक संयुक्त कुटुंब संरचनेत मूलभूत बदल झालाआहे किंवा कुटुंबाची संकल्पनाच बदलली आहे. कोणत्याही औपचारिक विवाहाशिवाय एकत्र येणारी जोडप्यांची संख्या समाजात वाढत चालली आहे (Line in Realtionship) केवळ वैवाहिक संबंध नव्हे तर पालक मुलांच्या नातेसंबंधातही प्रचंड बदल झाला आहे. वेगवेगळ्या कार्यात कार्यरत पालक व मुले एकमेकांना भेटण्यासाठी तसेच संवाद साधण्यासाठी वेळ देवू शकत नाही म्हणजेच अर्थकेंद्रित संस्कृती निर्माण होत आहे. त्यामुळे आई-वडील घरं गाठतात तोपर्यंत मुले झोपून जातात यामुळे पालक-मुले यांच्यात संवादाचा अभाव निर्माण होतो. कुटुंबाचे महत्त्वपूर्ण जे कार्य आहे समाजीकरण की ज्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या विकासासाठी मानसिक समाधानासाठी कार्यक्षमता वाढवण्यासाठी चांगला व्यक्ती बनण्यासाठी ते न होत असल्यामुळे मुलांमध्ये वर्तणुकीच्या समस्या निर्माण होत आहेत. त्याचप्रमाणे मुले परावलंबी राहत असल्यामुळे घरातील वृध्दांना कुटुंबात जो भावनिक, मानसिक आधार हवा असतो तो त्यांना मिळत नाही. त्यामुळेच समाजात बालसंस्कार केंद्र पाळणा घरे, वृध्दाश्रमात नव्याने व मोठ्या संख्येने निर्माण होत आहेत ते की पारंपारिक कुटुंबव्यवस्थेत अशा प्रकारे परिवर्तन होत आहे.

जागतिकीकरणाच्या प्रसारासाठी जन संचार माध्यमे महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहेत. समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टीकोनातून असे स्पष्ट होते की एकाच ठिकाणाहून अनेक लोकांचे संबोधन /जागृती/माहिती पाठविण्याची प्रक्रिया माध्यमामध्ये आहे.यामध्ये तंत्रज्ञानाचा उपयोग केला जातो. त्यामध्ये रेडिओ, टेलिव्हीजन भ्रमणध्वनी, इंटरनेट आणि सोशल मिडीया ह्या उपक्रमाने विश्वाला एका खेड्याप्रमाणे केले आहे. त्याचा उद्देश चांगला असला तरी प्रत्येक कुटुंबातील सदस्यांचा संवाद कमी होत चालला आहे. सिनेमाच्या, टेलिव्हीजनच्या माध्यमातून दाखविल्या जाणाऱ्या मालिकामधून कौटुंबीक सदस्यांचा संवाद कमी होत चालला आहे. सिनेमाच्या, टेलिव्हीजनच्या माध्यमातून दाखविल्या जाणाऱ्या मालिकामधून कौटुंबीक वाद कळत न कळत मोठ्या प्रमाणात तर होतो तसेच कुटुंबाचे विघटन होण्यास कारणीभूत असू शकतो. संयुक्त कुटुंबातील सदस्य एकत्र येवून जेवण करायचे आणि संवाद साधायचे परंतु


© Shaurya Publication, Latur | www.rjurunals.co.in | Email-hitechresearch11@gmail.com
Scanned by CamScanner

ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue 1, Vol II, 10th Feb. 2018

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे बहुतेकांना जंकफूड जसे पिझ्झा, बर्गर, चिप्स, नूडल्स आणि संध्याकाळ जेवणाच्या सवयीमुळे कुटुंबातील सदस्य फास्ट फूड सेंटरमध्ये तसेच हॉटेल मध्ये दिसतात. जागतिकीकरणाच्या पूर्वी व्यक्तीच्या जीवनात कुटुंबाची भूमिका महत्त्वपूर्ण होती ती आता कमी होत चालली आहे. वाढत्या भौतिकवादानुसार उपभोगवाद वाढला आहे. तरुण पिढी जीवनशैलीचा एक वेगळा प्रकार शोधत आहे. त्यांचे सहकारी, भागीदार नातेवाईक आवडत्या पिझ्झा इंटरनेट शोधत आहे. कुटुंबातील निर्णयात इत्यादी भाग न घेता व्हॅलेंटाइन डे, मदर्स डे, फादर्स डे चॉकलेट डे, फ्रेन्डशिप डे इ. नवीन संस्कृती उदयास आली आहे. त्यामुळे कौटुंबिक व्यवस्था जागतिकीकरणामुळे भारतीय संयुक्त कुटुंब पध्दतीत विघटन होत आहे त्यातून विभक्त कुटुंब पध्दती केंद्रित कुटुंब निर्माण होत आहे.

**सारांश :-**

भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंबसंस्था महत्त्वपूर्ण आहे. कुटुंबाच्या माध्यमातून सामाजिकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होत असते. त्यातूनच व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा विकास होत जाऊन चांगल्या व्यक्ती निर्माण होत जातात. जागतिकीकरणामुळे कुटुंबामध्ये जे परिवर्तन झाले त्यातून 'आम्ही' ची भावना कमी झाली असून 'मी' ची भावना निर्माण होऊन व्यक्ती हा अर्थकेंद्री बनला आहे. वाढत्या भौतिकवादानुसार उपभोगवाद वाढल्यामुळे कौटुंबिक मूल्यांची पायमल्ली होत आहे. जागतिकीकरणामुळे विश्व जवळ येवू लागले परंतु मानव- मानवपासून दूर होत चालला आहे.

**संदर्भ :-**


१. भार्गव, नरेश . वैश्वीकरण समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्य रावत पब्लिकेशन २०१४
२. shodhganga.infl;bant.ac.in
३. wwwmarathi.unlimitedin२०१३
४. https/mr.wikipedia.orc/wiki
५. आहुजा राम सामाजिक अनुसंधान रावत पब्लिकेशन २०१०
६. जोशी जैन भारतीय समाजव्यवस्था, नॅशनल पब्लिकेशन हाऊस, जयपूर २०१०




Scanned by CamScanner